पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सामाईक कार्यासनातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा नवनिर्मित सांस्कृतिक कार्य विभागाकडे वर्ग करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्र.: संकीर्ण २०२६ / प्र.क्र.९६ (भाग-१) / आस्थापना

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दि. २७ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :-

१. शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.आस्था-२०१७/प्र.क्र.१८२(भाग-१)/आस्था, दि.१८.०१.२०२२
२. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६८/आस्थापना, दि.२३.०५.२०२३
३. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६८/आस्थापना, दि.१२.०७.२०२३
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण १३२६/प्र.क्र.६८/प्रशा-१, दि.२४.०६.२०२६
५. अपर मुख्य सचिव (पर्यटन) यांचे अध्यक्षतेखालील बैठक दि.०२.०७.२०२६
६. अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शाकानि २०२६/प्र.क्र.३२/रवका-१, दि.१४.०८.२०२६
७. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टिडीएस-२०२५/१२/प्र.क्र.२०२/ पर्यटन-१, दि.२४.०८.२०२६
८. वित्त विभाग पत्र क्र. अर्थसं २०२६/प्र. क्र. ६४/अर्थ - ३, दि २५.०८.२०२६

प्रस्तावना:

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे विभाजन करून "पर्यटन विभाग" व "सांस्कृतिक कार्य विभाग" असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये विभागांनी मंजूर अधिकारी/कर्मचारी वाटप, आर्थिक बाबी, प्रशासकीय तसेच तांत्रिक बाबींसंबंधात कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.१४.०८.२०२६ अन्वये पर्यटन विभाग हा मूळ विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभाग हा नव्याने निर्माण झालेला विभाग आहे.

२. प्रशासनिक विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२.०७.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत, सामान्य प्रशासन विभागाच्या सूत्रानुसार सामाईक २६ पदांचे वाटप निश्चित करण्यात आले होते. तथापि, सांस्कृतिक कार्य विभागाकडून याप्रकरणी झालेल्या विलंबामुळे मा. मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत अडथळा निर्माण होत होता. सबब, प्रशासकीय कामकाजात गतिमानता व सुसूत्रता राखण्यासाठी पर्यटन विभागाच्या दि. २४.०८.२०२६ रोजीच्या शासन

निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, आस्थापना संनियंत्रक म्हणून सामाईक कार्यासनांतील कार्यरत मनुष्यबळ, वाहने, प्रलंबित आस्थापना प्रकरणे व इतर कामकाजाचे प्रमाणशीर वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२४ जून, २०२६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुत्रानुसार, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील आस्थापना, रोखशाखा, समन्वय, अर्थसंकल्प, नोंदणीशाखा या ५ सामाईक कार्यासनांसाठीच्या एकूण २६ मंजूर पदांचे मूळ पर्यटन विभाग व नवनिर्मित सांस्कृतिक कार्य विभागाकरीता नियत वाटप खालीलप्रमाणे करण्यास सदर शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे:

क्र.	पदनाम	सामायिक पदे (एकूण)		पर्यटन विभाग		सांस्कृतिक कार्य विभाग	
		मंजूर	रिक्त	मंजूर	रिक्त	मंजूर	रिक्त
१	अवर सचिव	१		१		०	
२	कक्ष अधिकारी	५	२	३	२	२	
३	सहायक कक्ष अधिकारी / रोखलेखापाल	८	१	४		४	१
४	लघुटंकलेखक	१	१	१	१	०	
४	लिपिक-टंकलेखक	७		४		३	
५	वाहनचालक (बाह्य यंत्रणा)	१		१		०	
६	शिपाई (बाह्य यंत्रणा)	३		१		२	
	एकूण	२६	४	१५	३	११	१

२. उपरोक्तनुसार पर्यटन विभागातील ३१ असामाईक पदे व १५ सामाईक पदे मिळून स्वतंत्र पर्यटन विभागास एकूण ४६ पदे, तसेच सांस्कृतिक कार्य विभागातील २४ असामाईक पदे व ११ सामाईक पदे मिळून स्वतंत्र सांस्कृतिक कार्य विभागास एकूण ३५ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील एकूण २६ सामाईक पदांवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे विभागनिहाय वाटप पुढीलप्रमाणे करण्यास सदर शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, रोख शाखा व अर्थसंकल्प शाखेचे कामकाज दि.३१.०३.२०२७ पर्यंत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनच पार पाडण्यात येईल. पर्यटन विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक बाबींकरीता सद्य:स्थितीत कार्यरत असलेले आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रक अधिकारी हेच दि.३१.०३.२०२७ पर्यंत कामकाज पाहतील. दरम्यानच्या कालावधीमध्ये नवनिर्मित सांस्कृतिक कार्य विभागाने शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या कार्यवाही, उदा-वित्त विभाग पत्र दि २५.०८.२०२६ नुसार नवीन मागणी क्र ZW अंतर्गत नवीन लेखाशीर्ष तयार करणे, नवीन आहरण व संवितरण अधिकारी क्रमांक व नियंत्रक अधिकारी क्रमांक तयार करणे, टॅन क्रमांक तयार करणे, जीएसटी क्रमांक तयार करणे इ बाबींची कार्यवाही करावी.

पदनाम	पर्यटन विभाग	सांस्कृतिक कार्य विभाग
अवर सचिव	१. श्री सुमंत पाष्टे	-
कक्ष अधिकारी	१. श्री अनुप कुडव	१. श्री सुनिल सुर्यवंशी
	२. (रिक्त)	२. श्रीम पद्मजा दाभोळकर
	३. (रिक्त)	
सहायक कक्ष अधिकारी / रोखलेखापाल	१. श्री सागर पवार	१. श्रीम फरजाना दांगे
	२. श्री देविदास राऊत	२. श्री प्रभाकर किंजळे
	३. श्रीम नेहा राणे	३. श्रीम सारीका जमादार
	४. श्री प्रतिक शिंदे	४. (रिक्त)
लघुटंकलेखक	१. (रिक्त)	
लिपिक-टंकलेखक	१. श्रीम विजयश्री पिंपळकर	१. श्री समीरकुमार लोंढे
	२. श्रीम सीमा पोवार	२. श्री अजय पाटील
	३. श्रीम अश्विनी धावणे	३. श्री रविंद्र जाधव
	४. श्रीम संज्योती कुमावत	
वाहनचालक	१. (बाह्ययंत्रणेमार्फत)	-
शिपाई	१. (बाह्ययंत्रणेमार्फत)	१. श्री दशरथ भदरगे
		२. श्रीम उषा गायकवाड

*श्री मिथिलेश पांचाळ, शिपाई हे दि.३१.०३.२०२७ पर्यंत अथवा पदस्थापनेबाबत स्वतंत्र आदेश प्राप्त होईपर्यंत सामाईक रोख शाखेचे काम पाहतील.

४. या व्यतिरिक्त नवनिर्मित विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत परिविक्षाधीन कक्ष अधिकारी / लिपिक टंकलेखकांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येत आहे:

पदनाम	पर्यटन विभाग	सांस्कृतिक विभाग
कक्ष अधिकारी	श्री प्रदीप आटोळे	-
लिपिक टंकलेखक	-	श्री योगेश साळवे

५. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मंजूर आकृतीबंधाव्यतिरीक्त सामान्य प्रशासन विभागाच्या दि १८.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर सेवा वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी, श्रीमती प्रगती नागपुरे, लिपिक टंकलेखक यांच्या सेवा पर्यटन विभागाकडे वर्ग करण्यात येत आहेत.

६. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे शासकीय कामकाजाच्या प्रयोजनार्थ सामाईकरीत्या सद्यः स्थितीत १ वाहन - स्टाफ कार म्हणून उपलब्ध आहेत. विभागाकडे उपलब्ध असलेल्या चल / अचल साधनसामुग्रीचे प्रमाणशील वाटपाच्या (Pro Rata Basis) तत्वानुसार या वाहनाचे विभागाच्या विभाजनानंतरचे वाटप खालीलप्रमाणे राहील:

विभाग	वाहन अनुज्ञेय असलेले पदनाम	वाहन	सद्य:स्थिती
पर्यटन विभाग	स्टाफ कार	मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर MH 01 AN 0405	वापरात

नवनिर्मित विभाग म्हणून सांस्कृतिक कार्य विभागाने वाहन अनुज्ञेयतेनुसार नवीन वाहन खरेदीची स्वतंत्र कार्यवाही करावी. तथापि, सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आवश्यकता भासल्यास सांस्कृतिक कार्य विभागास सदर वाहन वापरण्याची मुभा राहील.

७. उपरोक्त परिच्छेद क्र ३ मधील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांपैकी, श्री सुमंत पाष्टे, अवर सचिव हे त्यांच्या सध्याच्या दालन क्र १४८, मंत्रालय विस्तार इमारत येथेच कार्यरत राहतील. श्रीमती दाभोळकर, कक्ष अधिकारी आणि श्री. कुडव, कक्ष अधिकारी यांनी त्यांच्या सध्याच्या बैठक व्यवस्थेची परस्परांमध्ये अदलाबदल करावी. तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी हे सामान्य प्रशासन विभागाकडून नवनिर्मित विभागांना स्वतंत्र दालने (कार्यालयीन जागा) उपलब्ध होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या जागीच कार्यरत राहतील.

८. सद्यःस्थितीत विभागाच्या आस्थापना शाखेमध्ये सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या सेवा विषयक प्रकरणे, तसेच विभागीय चौकशीची चालू प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणे व तद्नुषंगिक बाबी संबंधित अधिकारी / कर्मचारी ज्या उपविभागातून सेवानिवृत्त झाले असतील अथवा कार्यरत असतील त्या प्रमाणे संबंधित विभागांकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्याची कार्यवाही करावी. याबाबत सद्य:स्थितीत कार्यरत आस्थापना शाखेने स्वतंत्र यादी तयार करावी. त्यानंतर संबंधित प्रकरणांच्या नस्त्या पुढील १ महिन्याच्या कालावधीमध्ये आपापल्या विभागाकडे प्राप्त होतील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ही दोन्ही स्वतंत्र विभागांच्या आस्थापना शाखेच्या अवर सचिवांची राहील.

९. सद्यःस्थितीत विभागाशी संबंधित सर्व देयके अदा करण्यासाठी खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या कालावधीसाठी सेवा पुरवठादारांची नेमणूक करण्यात आली असून देयकांशी संबंधित लेखाशीर्ष व त्यांच्याकडून करुन घेण्यात येत असलेल्या कामाचा तपशील "**प्रपत्र-अ**" मध्ये सोबत जोडण्यात येत आहे. विवरणपत्रात सर्व सेवा पुरवठादारांचा कंत्राटाचा कालावधी नमूद करण्यात आला आहे. संपुष्टात आलेल्या कंत्राटांना नव्याने आदेश निर्गमित होण्याकरीता लागणारा कालावधी लक्षात घेता २ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर नवनिर्मित विभागाने या प्रकरणी त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन देयकांची प्रतिपूर्ती करण्याबाबत कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२७१२१७१०११५० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.08.27 12:47:19 +05'30'

(संतोष जया विठ्ठल रोकडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. राज्यसभा/लोकसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई-३२
१०.अ.मु.स/प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. सर्व सह सचिव/उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी/स.क.अ./ लघुलेखक/ लिपीक टंकलेखक/शिपाई/वाहन चालक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कक्ष अधिकारी (प्रशासन-१/र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मुंबई-३२
१४. महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी
१७. निवडनस्ती, आस्थापना

प्रपत्र-अ

अ.क्र.	सेवा पुरवठादाराचे नाव	सेवा पुरवठादारांकडून करुन घ्यावयाची कामे	देयक अदा करण्यासाठी संबंधित लेखाशीर्ष	कंत्राटाचा कालावधी
१	मे. देविश एटरप्राईजेस, मुंबई	वापरात असलेल्या संगणकांच्या प्रिंटरचे टोनर रिसायक्लींग करण्याबाबत	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	दि.०१.०८.२०२५ ते दि.३१.०७.२०२६
२	मे. देविश एटरप्राईजेस, मुंबई	विभागास दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या एकत्रित लेखनसामुग्रीचा पुरवठा करणे	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा -०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	दि.०१.०८.२०२५ ते दि.३१.०७.२०२६
३	माऊली एंटरप्राईजेस, मुंबई	२ हेवी ड्युटी झेरॉक्स मशिन (All in One) अशी एकूण २ झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेणेबाबत	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा -०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	दि.०१.०८.२०२६ ते दि.३१.०७.२०२७
४	महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सह. संस्था, वांद्रे	विभागातील फर्निचर दुरुस्ती संदर्भातील कामे	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा -०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	उद्योग संचालनालय कडून दि.१२.०२.२०२५ रोजी शा. नि. निर्गमित केला आहे. त्यानुसार देयके अदा करण्यात येत आहेत.
५	आर. के. एंटरप्राईजेस, मुंबई	विभागातील नवीन, टोनर खरेदीबाबत.	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा -०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग १७ संगणक खर्च (२२५१०६३२)	दि.१३.१०.२०२५ ते दि.१२.१०.२०२६

अ.क्र.	सेवा पुरवठादाराचे नाव	सेवा पुरवठादारांकडून करुन घ्यावयाची कामे	देयक अदा करण्यासाठी संबंधित लेखाशीर्ष	कंत्राटाचा कालावधी
६	RCS InfoTech, Navi Mumbai	संगणक, प्रिंटर, स्कॅनर व इतर खरेदीबाबत	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा -०९०, सेक्रेटरिएट (०१) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (कार्यक्रम), १७ संगणक खर्च (२२५१०८९३)	मार्च २०२६ ते मार्च २०२९ (वॉरंटी)
७	क्लासिक इंटरटेनमेंट	टिव्ही केबल - इंटरनेट	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१०६३२)	मार्च २०२६ ते मार्च २०२७
८	सिध्दीविनायक एंटरप्रायजेस	बाहययंत्रणेदवारे शिपाई व वाहन चालक	झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१० कंत्राटी सेवा अनिवार्य (२२५१०६३२)	४ ऑगस्ट २०२६ ते ३ जुलै २०२७
९	मा. मंत्री / सचिव / प्रधान सचिव / सह सचिव/ उप सचिव यांची अल्पोपहार देयक		झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१०६३२)	
१०	वर्तमानपत्रे / मासिके देयक		झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०, सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	
११	सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित केलेल्या		झेडडी-१, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा-०९०,	

अ.क्र.	सेवा पुरवठादाराचे नाव	सेवा पुरवठादारांकडून करुन घ्यावयाची कामे	देयक अदा करण्यासाठी संबंधित लेखाशीर्ष	कंत्राटाचा कालावधी
	बैठकांची देयके		सचिवालय (०१) (०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग-१३ कार्यालयीन खर्च अनिवार्य (२२५१ ०६३२)	